# एचटीबीटी कापसाला अनुमती द्या

## खासदार संजय देशमुख यांची मागणी

◆ यवतमाळ, १ डिसेंबर

केंद्र सरकारने संसदेच्या या हिवाळी अधिवेशनात एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत पारदर्शक भूमिका मांडण्याची अपेक्षा खासदार संजय देशमुख यांनी 'तरुण भारत'शी बोलताना व्यक्त केली. केंद्रीय कृषी व किसान कल्याण राज्यमंत्री मंत्री भगीरथ चौधरी यांची एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबतची लोकसभेतील खालील उत्तरे संभ्रम वाढवत आहेत असेही ते म्हणाले.

गेली २० वर्षे केंद्र सरकार एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत जाणीवपूर्वक दिरंगाई करत असल्याचा आरोपही खा. देशमुख यांनी केला. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपिंदर यादव यांनी एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत विचार करीत असल्याचे १८ फेब्रुवारी रोजी मला लेखी उत्तराद्वारे कळविल्याचेही ते म्हणाले.

जिल्ह्यात कापूस पेरणी ५ लाख हेक्टरात आहे. जुलैमध्ये २१ दिवस पाऊस असतो. जिल्ह्यात कापसाचे रोज ५० हजार हेक्टर निंदण करायला ३७ लाख ५० हजार मजूर लागतात. तर दुसरीकडे एचटीबीटी कापसावर रोज ५० हजार हेक्टर तणनाशक फवारणीसाठी १ लाख मजूर लागतात. यवतमाळ जिल्ह्याची लोकसंख्या कापसाचे निंदण करण्यासाठी कमी पडते. यवतमाळ जिल्ह्याची लोकसंख्या ३१ लाख आहे, हेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

एचटीबीटी कापसाला पर्यावरण मंत्रालयाच्या अनुवांशिक अभियांत्रिकी मूल्यांकन समितीने २७ जुलै २०२२ रोजीच तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. या समितीने ९ जून २०२५ ला स्थापित तज्ज्ञ समितीची पुनर्रचनाही केली. पण, ही समिती एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत दिरंगाई करत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने ११ जुलै रोजी कोईम्बतूर येथे कापूस उत्पादनातील समस्यांबाबत तंत्रज्ञ, बियाणे उत्पादक व शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. याप्रसंगी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी देशात एचटीबीटी कापसाचे क्षेत्र वाढत आहे, असे सांगून पर्यावरण मंत्रालयाशी एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत चर्चा करतो, असे म्हटले होते.

तसेच महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिक कोकाटे यांनीही एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याची मागणी चर्चेदरम्यान केली होती. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनीही या चर्चासत्राला संबोधित केले होते, अशीही माहिती खा. देशमुख यांनी दिली. खा. संजय देशमुखांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी पर्यावरण मंत्रालयाशी एचटीबीटी कापसाला अनुमती देण्याबाबत काय बोलणे झाले, याचीही माहिती द्यावी, अशी मागणी केली.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

**Tarun Bharat, 2 December, 2025**